**नियमित दिवाणी दावा क्र. २२/२०१०**

**गजानन साबळे –विरुद्ध– विठ्ठल राठोड**

**निशाणी क्र.४५ लगत निरंतर**

**उलट तपासणी वादी गजानन साबळे यांची प्रतिवादी क्र.१ यांचे विद्वान अधिवक्ता श्री. आर. बी. विघ्ने यांच्या मार्फत शपथेवर सुरू.**

**१.** माझे शिक्षण इयत्ता चौथी पर्यंत झाले आहे. मला मराठी भाषा लिहिता आणि वाचता येते. सर्वे क्र.४३/२ सिंदखेड राजा भाग १ यामध्ये माझी ४ हे. ३० आर जमीन होती. सध्या माझ्या नावाने वरील नमुद गटामध्ये केवळ १९ गुंठे जमीन शिल्लक राहिली आहे. माझी आई नामे अन्नपुर्णा बाई हिच्या नावे ७८ गुंठे शेतजमीन सर्वे क्र.४३/२ मध्ये आहे. माझ्या नावे व माझ्या आईच्या नावे असलेली वर नमुद जमीन सोडून, ४ हे. ३० आर यापैकी उर्वरीत शेतजमीन माझ्या आईने व भावाने विक्री केली आहे. हे म्हणणे खरे आहे की, सर्वे क्र. ४३/२ सध्याच्या सातबारा उताऱ्यामध्ये एकुण २६ व्यक्तींची नावे आहेत. हे म्हणणे खरे आहे की,त्या लोकांपैकी कोणाकडे १ गुंठा कोणकडे ६ गुंठे कोणाकडे ३ गुंठे असे क्षेत्रफळ आहे. हे म्हणणे खरे नाही की, सध्या सर्वे क्र ४३/२ यामध्ये २० ते २५ लोकांनी घरे बांधलेली आहेत. सध्या तेथे केवळ ५ ते ६ लोकांनी घरे बांधलेली आहेत. हे म्हणणे खरे नाही की, त्या गटातील बऱ्याच लोकांनी तहसिलदार सिंदखेड राजा यांच्याकडून त्यांच्या नावे असलेल्या जमीनीचे अकृषिक रुपांतर करून घेतलेले आहे. मी स्वतः सर्वे क्र. ४३/२ यामधील शेतजमीन कोणासही विक्री केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या आईने व भावाने ज्या लोकांना जमीनी विक्री केल्या आहेत ते विक्रीपत्र नोंदणीकृत खरेदीखत आहे. मला असे म्हणायचे आहे की, माझ्या आईने व भावाने कोणत्याही

व्यक्तीला केवळ मृद्रांकावर जमीन विक्री केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.१ नामे विठ्ठल राठोड याने प्रतिदाव्यात नमुद ३ गुंठे शेतजमीन ही प्रतिवादी क्र.२ छबुराव सातपुते यांच्याकडुन नोंदणीकृत खरेदीखताने विकत घेतली आहे. हे म्हणणे खरे नाही की, सर्वे क्र.४३/२ यामधील २ गुंठे जमीन प्रतिवादी क्र.२ छबुराव सातपुते यांनी दि.०२/११/१९९८ रोजी माझ्याकडुन नोंदणीकृत खरेदीखताने मोबदला किंमत ४५,०००/– रुपये देऊन विकत घेतली होती. हे म्हणणे खरे नाही की, खरेदीखताच्या दिवशी ती २ गुंठे जमीन प्रतिवादी क्र.२ छबुराव यांनी माझ्याकडुन ताब्यात घेतली होती. हे म्हणणे खरे नाही की, त्या मिळकतीच्या उत्तर दिशेकडील १ आर शेतजमीन मी पुन्हा विक्रीस काढली होती. हे म्हणणे खरे नाही की, दि.११/०७/२००१ रोजी छबुराव यांनी मला त्या १ गुंठा शेतजमीनीची किंमत ४५,०००/– रुपये ही दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी गुंठेवारी शेतजमीनीची नोंदणी रद्द असल्यामुळे मी दि.११/०७/२००१ रोजी शंभर रुपये किंमतीच्या मृद्रांकावर प्रतिवादी क्र.२ छबुराव सातपुते यांच्या नावे खरेदीखत नोंदवून दिले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्या खरेदीखताआधारे छबुराव सातपुते हा १ आर जमीनीचा मालक व ताबेदार झाला होता. हे म्हणणे खरे नाही की, नोंदणीकृत खरेदीखताआधारे विकत घेतलेली दोन आर व दि.११/०७/२००१ रोजी विकत घेतलेली १ आर अशा ३ आर जमीनीचे खरेदी खत प्रतिवादी क्र.२ छबुराव सातपुते यांनी प्रतिवादी क्र.१ विठ्ठल राठोड यांच्या हक्कात मोबदला किमत १,००,०००/– रुपये घेऊन करून दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.१ हा खरेदी दिनांकापासून त्या ३ गुंठे शेतजमीनीचा मालक आणि कब्जेदार आहे.

२.	आता मला माझे वादपत्र दाखविले हे म्हणणे खरे आहे की, मी वादपत्रामध्ये वर्ष १९९८ मध्ये प्रतिवादी क्र.२ छबुराव यांना करून दिलेल्या २ गुंठे शेतजमीनीचे खरेदीखत माझ्या हक्कावर बंधनकारक नाही किंवा ते रद्द करावे,

असा अनुतोष मागितलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, सध्या वादग्रस्त ३ गुंठे जमीनीवर प्रतिवादी क्र.१ विठ्ठल राठोड यांचे घर असुन त्या घराचा ताबा मला पाडुन उर्वरीत जमीन मिळावी, याकरीता मी सुधारीत वादपत्र दाखल केले आहे. आता मला फेरफार क्र.३५१२ हा दाखविला. हे म्हणणे खरे नाही की, सदर फेरफार हा दि.०६/०३/२००२ रोजी घेण्यात आला. हे म्हणणे खरे नाही की, मी छबुराव सातपुते यांना विकलेल्या एकुण ३ आर जमीनीचा फेरफार १९९८ मध्ये झालेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.२ छबुराव सातपुते यांच्या नावे सर्वे क्र४३/२ यामध्ये ३ गुंठे जमीनीची नोंद झाली होती.

**न्यायालयाचा वेळ संपल्यामुळे उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.**

श्रवणोत्तर स्वीकृत

Digitally signed by SHINDE SATISH GANESHRAO
Date: 2025.08.06 17:39:19 +0530

स्थळ–सिंदखेड राजा (सतिश ग. शिंदे)

दि. ०६/०८/२०२५ दिवाणी न्यायाधीश (क–स्तर), सिंदखेड राजा

**प्रमाणपत्र**

मी, खात्रीपूर्वक कथन करतो की, पी.डी.एफ. फाईल मधील आदेशाचा/न्यायनिर्णयाचा संपूर्ण मजकूर हा मूळ आदेशाप्रमाणे/न्यायनिर्णयाप्रमाणे शब्दशः, तंतोतंत व बरोबर आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नांव | – | श्री. श्रीकृष्ण ज्ञानेश्वर परिहार (ग्रेड–३) |
| न्यायालयाचे नांव | – | दिवाणी व फौजदारी न्यायालय, सिंदखेड राजा |
| दिनांक | – | ०६/०८/२०२५ |

सिंदखेड राजा